पोलीस स्टेशन वडगाव (ज.) जि. यवतमाळ

प्रेस नोट

दि.08/11/2022

पोलीस स्टेशन वडगाव जंगल जि. यवतमाळ

**यवतमाळ येथून सदोबा सावळी येथे जाणारा प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखू, पानमसाला व स्वीट सुपारी घेऊन जाणाऱ्यावर SDPO कार्यालय व पोलीस स्टेशन वडगाव जंगलची संयुक्तीक कार्यवाही**

दि.08/11/2022 रोजी रात्री 01.30 वा. सुमारास गुप्त माहितीच्या आधारे मो. दाऊन मो. युनूस डेलानी वय 44 वर्षे रा. कोहीनुर सोसायटी यवतमाळ हा त्याचे वाहन ह्युंदाई सँट्रो क्र.MH 04 BY 5441 ने प्रतिबंधीत असलेले 1) इगल सुगंधीत तंबाखू चे 420 पाकीट किं.2,94,000 रू.,2) क्रेझ सुगंधीत तंबाखू 66 पाकीट किं.23100 रू. 3) मजा 108 सुगंधीत तंबाखू 40 डब्बे 935 रू. डब्ब्याप्रमाणे किं.37400 रू. 4) मजा 108 सुगंधीत तंबाखू 150 डब्बे 235 रू. डब्ब्याप्रमाणे किं.35250 रू. 5) राजनिवास पान मसाला 25 पाकीट किं.4800 रू. 6) एक्स.एल.01 सुगंधीत तंबाखू 25 पाकीट किं.750 रू. 7) दिल्ली स्वीट सुपारी 420 पाकीट किं.25200 रू. तसेच वाहन वाहन ह्युंदाई सँट्रो क्र.MH 04 BY 5441 किं.अं.200,000 असा एकूण 6,20,500 रू. चा माल घेऊन जाताना अकोलाबाजार रोडवर लोणी घाटाणा फाट्याजवळ मिळून आला. वरून आरोपी मो. दाऊन मो. युनूस डेलानी वय 44 वर्षे रा. कोहीनुर सोसायटी यवतमाळ वर श्री घनशाम पंजाबराव दंदे वय 43 वर्षे अन्न सुरक्षा अधिकारी यवतमाळ, अन्न व औषध प्रशासन यांच्या फिर्यादीवरून भादंवि. चे कलम 328, 272, 273, 188 सहकलम मानवी सेवनास अपायकारक व नशाकारक अन्नपदार्थाची विक्री करीता वाहतूक करण्यासंबंधी अन्न व सुरक्षा मानके कायदा 2006 नियम व नियमने 2011 कलम 26(2)(आय), 27(3)(ई) सहकलम 30(2)(ए) चे उल्लंघन करून कलम 59 चा भंग केल्याने आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक डॉ.पवन बन्सोड साहेब, अपर पोलीस अधिक्षक मा.पियुष जगताप साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी मा. संपतराव भोसले साहेब यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. श्री पवन राठोड, पोलीस उपनिरीक्षक श्री भास्कर दरणे पो.स्टे.वडगाव जंगल, पोहेकॉ गजानन कोरडे, पोना निर्मल प्रधान, विकास कामनार, निलकमल भोसले यांनी पार पाडली. पुढील तपास सपोनि. पवन राठोड यांचे मार्गदर्शनात पोउपनि. भास्कर दरणे पो.स्टे. वडगाव जंगल हे करीत आहेत.

ठाणेदार

पो.स्टे. वडगांव, जि यवतमाळ